महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, तुळजापूर रोड, उस्मानाबाद.
Govt. of Maharashtra Office of the Dean
Govt. Ayurvedic College, Tuljapur Road, Osmanabad- 413 501
Tel No.02472-251741 Email id- gacosbd@gmail.com

जा.क्र.शाआमउ/आस्था/प्राध्या./सह.प्रा./सहा.प्रा./कंत्राटी/ जाहिरात/4692 /२०२३ दि.07 /07 /२०२३

## पाहिजेत

संदर्भ :- १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन अधिसूचना दिनांक २६ जूलै,२०१३

२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय,क्रमांक : आयुसे-१०२१/प्र.क्र.१३० (भाग-१) आयु-१ दिनांक ०४ नोव्हेंबर,२०२२

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयान्वये निर्देशित केल्यानुसार या महाविद्यालयातील विविध विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील खालील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विहीत अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुंक उमेदवारांनी गुरुवार दिनांक २७.०७.२०२३ रोजी थेट मुलाखतीसाठी (Walk in Interview) आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह सकाळी ११.०० वाजता या महाविद्यालयात स्वखर्चाने उपस्थित रहावे

**रिक्त पदांचा तपशील :**

| विषय | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|---|
| | एकुण रिक्त पदे | एकुण रिक्त पदे | एकुण रिक्त पदे |
| द्रव्यगुण | ०१ | — | - |
| कौमारभृत्य | — | ०१ | — |
| शरिररचना | — | ०१ | — |
| **एकुण रिक्त पदे** | ०१ | ०२ | ०० |

| पदनाम | प्राध्यापक |
|---|---|
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | १) ज्याने वैद्यक व्यवसायी अधिनियम,१९६१ (१९६१ चा महा. अधिनियम २८) याला जोडलेल्या अनुसुचीतील भाग अ, अ-१ ब किंवा क मध्ये नमूद केलेली अर्हता किंवा भारतीय केंद्रीय चिकित्सा परिषद अधिनियम,१९७० (१९७० चा ४८) या अन्वये भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद,नवी दिल्ली यांनी वेळोवळी विनिर्दीष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल आणि मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल.<br>२) ज्याला, संबंधीत आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधीत आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणुन पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असला पाहिजे. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | ३) ज्यांच्याकडे इंग्रजी,मराठी,संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल. परंतु ज्या उमेदवारांचे मुळ शोध निबंध हे भारतीय चिकित्सा केद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय स्तरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये प्रसिध्द झाले असतील, त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| **मानधन** | प्रति महा रु.१,००,०००/- (या व्यतिरीक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायचे अनुज्ञेय असणार नाहीत.तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवाराच्या उपस्थिती नुसार अदा करण्यात येईल.) |
| **पदनाम** | **सहयोगी प्राध्यापक** |
| **वयोमर्यादा** | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत. |
| **शैक्षणिक अर्हता व अनुभव** | १) ज्याने महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम,१९६१ (१९६१ चा महा. अधिनियम २८) याला जोडलेल्या अनुसुचीतील भाग अ, अ-१ ब किंवा क मध्ये नमूद केलेली अर्हता किंवा भारतीय केंद्रीय चिकित्स परिषद अधिनियम,१९७० (१९७० चा ४८) या अन्वये भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद,नवी दिल्ली यांनी वेळोवळी विनिर्दीष्ट केलेली समतुल्य अर्हता धारण केली असेल आणि मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>२) ज्याला, संबंधीत आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण पाच वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधीत आयुर्वेदाच्या विषयाचे सहायक प्राध्यापक म्हणुन तीन वर्षे अध्यापनाचा अनुभव असला पाहिजे.<br>३) ज्यांच्याकडे इंग्रजी,मराठी,संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल. परंतु ज्या उमेदवारांचे मुळ शोध निबंध हे भारतीय चिकित्सा केद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय स्तरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये प्रसिध्द झाले असतील, त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| **मानधन** | प्रतिमहा रु.८०,०००/-(या व्यतरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व अर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवाराच्या उपस्थितीनुसार अदा करण्यात येईल. |
| नियुक्ती कालावधी व इतर अटी | **१. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन किंवा आस्थापना मंडळाकडुन वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त अथवा ११ महिने कालावधीकरीता या पैकी जे अगोदर घडेल तो सेवेचा कालावधी राहील. ११ महिने कालावधी समाप्तीनंतर पुन्हा जाहिरात प्रकाशित करुन निवड प्रक्रियेव्दारे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरिता नियुक्ती दिली जाईल. तसेच वयाची ६५ वर्षे पुर्ण केल्या नंतर कोणत्याही परिस्थीतीत पुनर्नियुक्ती देण्यात येणार नाही.**<br>**२. नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.**<br>**३. सदर पदावर नियमीत उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.**<br>**४. नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील.**<br>**५. उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील.**<br>**६. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.**<br>**७. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे /माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.** |



Scanned with OKEN Scanner

८. कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकानुसार अध्यापन,रुग्णसेवा,तसेच अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

९. कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवाराना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

१०.कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०३) महिन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०३) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल.

११.कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील.

१२.कंत्राटी पध्दतीच्या उमेदवारांस विभागातील नियमित कार्यरत वरिष्ठ अध्यापक तसेच अधिष्ठाता यांच्या नियत्रंणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील.

१३.कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील.

१४.कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही कंत्राटी पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच कंत्राटी पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही.

१५.नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन (७) दिवसाच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल.

१६.कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१७.शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीचे तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील.

१८.नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत.

१९.उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेच्या/महाविद्यालयाच्या लेटरहेडवरील सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील ना-हरकत प्रमाणपत्र जोडावे तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे/महाविद्यालयाचे कार्यमुक्ती आदेश (**Relieving Order**) सोबत असणे आवश्यक राहील.

(प्रा.डॉ.ना.सु.गंगासागरे)
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद



Scanned with OKEN Scanner

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवुन त्यावर स्वत: स्वाक्षरी करावी. |
|---|

अर्जाचा नमुना

महाराष्ट्र शासन

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद

विषय :- आपल्या महाविद्यालयातील ......................... (पद व विषयाचे नांव) या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत

संदर्भ:- आपली जाहिरात दिनांक..............

महोदय,
उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या महाविद्यालयातील .....................या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.
माझी संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपुर्ण नांव | : | | | |
| | | | आडनाव | स्वत:चे नांव | वडीलांचे/पतीचे नांव |
| २) | नवीन अध्यापक सांकेतांक (Permanent NEW CCIM TEACHER CODE) | : | | | |
| ३) | पत्रव्यवहाराचा पत्ता | : | | | |
| ४) | भ्रमणध्वनी क्रमांक : | : | | | |
| ५) | ई-मेल : | : | | | |
| ६) | जन्म दिनांक | : | | | |
| ७) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वय | : | वर्ष | महीने | दिवस |
| | | | | | |
| ८) | राष्ट्रीयत्व | : | | | |
| ९) | शैक्षणिक अर्हता : बीएएमएस प्रथम वर्षापासुन सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या सांक्षाकीत गुणपत्रीका जोडाव्यात : | | | | |

| अ.क्रं. | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २ | | | | |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |
| | ५ | | | | |
| | ६ | | | | |

१०) अवगत असणा-या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११) कामाचा अनुभव : (प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल)

| अ.क्रं. | संस्थेचे नांव | धारण केलेले पद व विषय | अनुभवाचा कालावधी व विद्यापीठ मान्यतापत्र क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |

१२) प्रकाशित लेखांचा तपशिल (लेखांच्या सांक्षाकीत प्रती जोडण्यात याव्यात) :

१३) प्रकाशित पुस्तकांचा तपशिल :

१४) संगणक अर्हता (MS-CIT, तत्सम)

१५) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल :

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६. | |
| ७. | |
| ८. | |
| ८. | |
| ९. | |
| १०. | |

उमेदवाराची स्वाक्षरी

(संपुर्ण नांव)



Scanned with OKEN Scanner

# ना-हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वैद्य/वैद्या ............................ या महाविद्यालयात दिनांक .. ........... पासुन ....................या पदावर कार्यरत आहेत.

वैद्य/वैद्या ........................ ....... यांची शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,उस्मानाबाद येथे प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक या पदावर करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

संस्था प्रमुख

प्राचार्य/अधिष्ठाता



Scanned with OKEN Scanner

# प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ..............................................प्रतिज्ञापुर्वक नमुद करतो/करते कि, वर नमुद केलेली माहीती पुर्णतः खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यात येईल आणि माझेविरुध्द कायदेशीर कार्यवाही होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमीत नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहीरातीत उल्लेखीत कारणास्तव नियमीत नियुक्तीचा उमेदवार/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन/आस्थापना मंडळाकडुन/बदलीने उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरती स्वरुपाची कंत्राटी नेमणुक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

(संपुर्ण नांव)



Scanned with OKEN Scanner